# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 02/01/2023 (सोमवार) सकाळ

---

## दुखापत

पो.स्टे. खापरखेडा :— अंतर्गत खापरखेडा वार्ड नं. ०१ येथे दिनांक ०१/०१/२०२२ चे २३.३० वा. सुमारास फिर्यादी नामे— अरविंद गणपत पाटील, वय २५ वर्षे, रा. वार्ड क्र. ०१ खापरखेडा हा त्याचे मोहल्ल्यातील चुलतभाउ नामे— उमेश शेंडे याच्या मुलाच्या वाढदिवसाच्या कार्यक्रमाकरीता मित्र नामे— रूपेश रंगारी, सागर भुरे, मनिश बावणधडे, अनिकेत पंधरेसह गेला होता. कार्यक्रमामध्ये आपल्या मित्रासह डि. जे. च्या गाण्यावर डान्स करीत होते. मित्र अनिकेत पंधरे याने डि. जे. वाजविणा—या मुलास दुसरे गाणे वाजविण्यास सांगितले असता तेथे हजर असलेला आरोपी नामे— शुभम चिचखेडे रा. वार्ड क्र. ०२ याने त्याचे जवळ येवुन सि. डी. प्लेअर त्याचे डोक्यावर मारल्याने डोक्याला जखमी होवुन त्याचे डोक्यातुन रक्त निघाले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ३२४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक जाधव मो. नं. ९९२३१०४३१० हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर